आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
६ नोव्हेंबर २1०२४ - बुधवार

ठळक बातम्या

- भारतीय राज्यघटना हा फक्त ग्रंथ नसून जगण्याचा मार्ग असल्याचं राहुल गांधी यांचं नागपूर इथल्या सभेत प्रतिपादन
- विधानसभा निवडणुकीसाठीचा राष्ट्रवादी काँग्रेसचा जाहीरनामा प्रसिद्ध, मुख्यमंत्र्यांकडून महायुतीच्या १० वचनांची घोषणा
- महायुतीच्या उमेदवारांविरोधात बंडखोरी केल्यानं भाजपकडून राज्यभरातल्या चाळीस पदाधिकाऱ्यांचं निलंबन
- अमेरिकी राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प पुन्हा विजयी, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून अभिनंदन
- मनदीप जांगराने पटकावलं जागतिक बॉक्सिंग महासंघाच्या स्पर्धेचं विश्वविजेतेपद

<><><><>

भारतीय राज्यघटना हा फक्त ग्रंथ नसून जगण्याचा मार्ग आहे. भारताची राज्यघटना, त्यात मांडलेले विचार हजारो वर्षं जुने आहेत. महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, भगवान गौतम बुद्ध, बसवेश्वर या सर्वांच्या विचारांचा अंतर्भाव त्यात आहे, आणि त्याचं रक्षण आम्ही करत आहोत, असं प्रतिपादन काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केलं आहे. नागपूर इथं संविधान सन्मान संमेलनात ते आज बोलत होते. जातनिहाय जनगणना आणि आरक्षणावरची ५० टक्क्यांची मर्यादा काढून टाकणं या भूमिकांचा पुनरुच्चार त्यांनी केला.. भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ विकास, प्रगती, अर्थव्यवस्था अशा शब्दांच्या आडून राज्यघटनेवर हल्ला करतात, असा आरोप त्यांनी केला. नागपूर इथं पोहोचल्यानंतर त्यांनी दीक्षाभूमीला भेट दिली आणि. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आदरांजली वाहिली.

सायंकाळी राहुल गांधी यांच्या हस्ते विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसचा जाहीरनामा मुंबईतल्या वांद्रे कुर्ला संकुल इथे प्रसिद्ध होणार आहे. त्यानंतर महाविकास आघाडीच्या महाराष्ट्र स्वाभिमान सभेलाही ते संबोधित करतील.

<><><><>

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल कोल्हापूर इथल्या सभेत विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा प्रारंभ केला. या सभेत त्यांनी महायुतीच्या १० वचनांची घोषणा केली. यात लाडक्या बहिणींना एकवीसशे रुपये, शेतकऱ्यांना कर्जमाफी, शेतकरी सन्मान योजनेत १५ हजार रुपये, प्रत्येकाला अन्न आणि निवारा, वृद्ध पेन्शनधारकांना एकवीसशे रुपये, २५ लाख रोजगार निर्मिती तसंच अंगणवाडी आणि आशा सेविकांना १५ हजार रुपये वेतन, वीज बिलात ३० टक्के कपात अशा वचनांचा समावेश आहे. या सभेला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार उपस्थित होते.

<><><><>

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या मासिक रकमेत ६०० रुपयांची वाढ करून पात्र महिलांना २१०० रुपये देण्याचं आश्वासन राष्ट्रवादी काँग्रेसनं आपल्या जाहीरनाम्यात दिलं आहे. प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी आज मुंबईत हा जाहीरनामा प्रसिद्ध केला. महायुतीच्या १० वचनांचा समावेश यात आहे. तसंच या निवडणुकीत पक्ष लढवत असलेल्या मतदारसंघांपैकी ५० मतदारसंघांचे स्वतंत्र जाहीरनाम्यांच्या सारांश पुस्तिकेचं प्रकाशनही त्यांनी केलं. आपापल्या मतदारसंघांचा जाहीरनामा जाणून घेण्यासाठी टोल-फ्री क्रमांकही तटकरे यांनी जाहीर केला.

अजित पवार यांनी बारामतीतून या मतदारसंघासाठीचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. बारामतीला देशातलं सर्वात आदर्श आणि प्रगत तालुका बनवण्यासाठी आपण कटीबद्ध असल्याचं अजित पवार यांनी सांगितलं. बारामतीत राज्यातली

पहिली जागतिक दर्जाची क्रीडा अकादमी उभारणं, किमान आधारभूत मूल्याधारित अन्नप्रक्रिया केंद्रांची साखळी निर्माण करून रोजगारनिर्मिती, लॉजिस्टिक पार्कची निर्मिती, बारामतीला भारतातलं पहिलं सौरऊर्जा शहर बनवणं, कर्करोग रुग्णालय उभारणं या वचनांचा समावेश या जाहीरनाम्यात आहे.

<><><><>

भारतीय जनता पक्ष आणि महायुतीच्या उमेदवारांविरोधात बंडखोरी केल्यानं भाजपनं राज्यभरातल्या आपल्या चाळीस पदाधिकाऱ्यांना निलंबित केलं आहे. त्यात आमदार श्रीकांत भारतीय यांचे बंधू तुषार भारतीय, श्रीगोंदा इथल्या सुवर्णा पाचपुते यांच्यासह अनेकांचा समावेश आहे.

<><><><>

आपलं सरकार आलं, तर शेतकऱ्यांचं नुकसान न करता तेल, डाळ, साखर, तांदूळ, गहू या पाच जीवनावश्यक वस्तूंचे भाव पाच वर्षं स्थिर ठेवून दाखवू, असं आश्वासन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी काल दिलं. रत्नागिरी जिल्ह्यातून विधानसभा निवडणूक लढवणाऱ्या त्यांच्या पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी रत्नागिरी इथं काल संध्याकाळी त्यांची सभा झाली. आपलं सरकार आलं, तर बारसू रिफायनरी प्रकल्प हद्दपार करू असं आश्वासनही त्यांनी या सभेत बोलताना दिलं.

<><><><>

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी काल यवतमाळच्या राळेगाव इथल्या सभेत ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यावर टीका केली. यावेळी लाडकी बहीण योजनेवरुनही त्यांनी टीका केली. आपलं सरकार असल्या फुकट गोष्टी देण्याऐवजी महिलांना सक्षम करेल आणि त्यांच्या हाताला काम देईल असाही विश्वास त्यांनी दिला. विकासाची ब्लु प्रिंट मांडणारा पहिला पक्ष मनसे आहे असंही त्यांनी सांगितले.

<><><><>

भारतीय जनता पक्ष धर्माच्या नावावर द्वेष पसरवून मुस्लीम समाजाला भीती दाखवण्याचं काम करतो आहे अशी टीका एम आय एम पक्षाचे नेते खासदार असदुद्दीन ओवैसी यांनी धुळ्यात झालेल्या जाहीर सभेत केली. धुळे शहर विधानसभा मतदारसंघातले एम आय एम पक्षाचे उमेदवार आमदार फारुख शहा यांच्या प्रचारार्थ काल ही जाहीर सभा झाली,त्यात ओवैसी बोलत होते. विकासाच्या मुद्यावर मतदान करण्याचं आवाहन त्यांनी लोकांना केलं.

<><><><>

जीएसटी परिषदेच्या बैठकीत राज्याचे अर्थमंत्री उपस्थित राहत नसल्याबद्दल ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी नाराजी व्यक्त केली आहे. बारामतीमध्ये काल ते व्यापाऱ्यांना संबोधित करत होते. जीएसटी परिषदेच्या बैठकीला राज्याचे अर्थमंत्री सातत्याने गैरहजर राहतात. त्यामुळं राज्याची भूमिका मांडली जात नाही. केंद्रीय अर्थमंत्र्यांकडे जीएसटीच्या संदर्भात समस्या घेऊन गेल्यावर त्यांनीही हेच सांगितल्याचं पवार म्हणाले. महाविकास आघाडीत सत्तेत आल्यावर जीएसटीचा प्रश्न अधिक प्रभावीपणे मांडू असं आश्वासन त्यांनी दिलं.

<><><><>

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या **Youtube** वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज यवतमाळ जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

<><><><>

अखिल भारतीय नाट्य विद्यामंदिर समितीच्या वतीनं दिला जाणारा ५७वा विष्णुदास भावे पुरस्कार मराठी-हिंदी चित्रपट अभिनेत्री सुहास जोशी यांना अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. जब्बार पटेल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. २५ हजार रुपये रोख, शाल आणि सन्मानचिन्ह असं या पुरस्काराचं स्वरूप आहे.

**<><><><>**

मुंबई उपनगरी रेल्वेच्या कसारा स्थानकाजवळ आज सकाळी रेल्वे इंजिन घसरल्यामुळे  उपनगरी मध्य रेल्वेच्या काही लांब पल्ल्याच्या  गाड्या उशीराने धावत होत्या.  रेल्वे मार्ग पूर्ववत करण्याचे काम सुरु आहे असं मध्यरेल्वेने एक्सवरच्या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><>**

अमेरिकी राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचे डोनाल्ड ट्रम्प पुन्हा विजयी झाले आहेत. राष्ट्राध्यक्षपदासाठी आवश्यक असलेली ५३८ पैकी २७० इलेक्टोरल मतं मिळवण्यात ते थोड्याच वेळापूर्वी यशस्वी ठरले. J D वान्स हे त्यांच्या पक्षाचे उपाध्यक्ष पदाचे उमेदवार आहेत. फॉक्स न्यूजनं दिलेल्या वृत्तानुसार ट्रम्प यांना २७७ तर डेमोक्रेटिक पक्षाच्या उमेदवार कमला हॅरिस यांना २२६ इलेक्टोरल मतं मिळाली आहेत. अजून ३५ मतांची मोजणी शिल्लक आहे. एकूण ३१५ मतं मिळवू असा विश्वास ट्रम्प यांनी व्यक्त केला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या विजयाबद्दल ट्रम्प यांचं अभिनंदन केलं आहे. यामुळं दोन्ही देशातली जागतिक आणि धोरणात्मक भागिदारी आणखी मजबूत होईल, लोकांच्या भल्यासाठी, जागतिक शांतता, स्थैर्य यासाठी एकत्र काम करुया, असं प्रधानमंत्री म्हणाले.

**<><><><>**

भारतीय बॉक्सर मनदीप जांगरा यानं जागतिक बॉक्सिंग महासंघाचं सुपर फेदरवेट विश्वविजेतेपद पटकावलं आहे. त्यानं काल ब्रिटनच्या कोनोर मॅकिन्टोशचा १०-० असा पराभव केला. मनदीप कोणत्याही प्रो-बॉक्सिंग प्रकारात विश्वविजेता होणारा पहिला भारतीय बॉक्सर ठरला आहे.

**<><><><>**

आगामी IPL चे लिलाव २४ आणि २५ नोव्हेंबरला सौदी अरेबियातल्या जेद्दाहमध्ये होणार आहेत. BCCI ने काल ही घोषणा केली. ११६५ भारतीय आणि ४०९ परदेशी असे एकूण १ हजार ५७४ खेळाडू या लिलावात सहभागी होणार आहेत. प्रत्येक फ्रँचाइसीला एकूण २५ खेळाडू निवडता येतील. सुमारे साडे सहाशे कोटी रुपयांची उलाढाल यंदा होण्याची शक्यता आहे.

**<><><><>**

देशातल्या शेअर बाजारात आजही जोरदार तेजी आहे. सकाळी व्यवहार सुरू झाल्यावर असलेली तेजी हळूहळू वाढते आहे. सध्या सेन्सेक्स सुमारे ९०० अंकांनी वधारून ८० हजारांच्या पातळीच्यावर व्यवहार करतो आहे. निफ्टी अडीचशेहून अधिक अंकांनी वधारला असून २४ हजार ४०० च्या वर व्यवहार सुरू आहेत.

**<><><><>**

मुंबई - अहमदाबाद बुलेट ट्रेनच्या कामादरम्यान काल ३ कॉंक्रीटचे ब्लॉक कोसळल्यानं ३ मजुरांचा मृत्यू झाला आणि १ जण जखमी झाला. आणंद जिल्ह्यात माही नदीवर बनवण्यात येणाऱ्या पुलासाठी हे ब्लॉक वापरले जात होते.

मृतांच्या वारसांना २० लाख रुपयांची मदत दिली आहे. या प्रकरणाची तांत्रिक चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**<><><><><>**